296
13/12/2005 19

वाचले : १) मा. उपजिल्हाधिकारी (अपिले) ठाणे यांचे आदेश क्र. आरटीएस/अपिल/२२/०४, दिनांक २०.१०.२००४.

२) म.ज.म.अ. १९६६ चे कलम ५०

--------------

क्र.उपविअ/जमिनबाब/शर्तभंग/कावि-८८३
उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर
विभाग उल्हासनगर यांचे कार्यालय.
दिनांक : ३०.११.२००५.

प्रकरणाची थोडक्यात हकीकत.

दि एज्यूकेशन सोसायटी, अंबरनाथ यांना मौजे-कोहोज खुंटवली येथील डी.डी.स्कीम नं. १५, प्लॉट नं.२३, क्षेत्र १२९२८ चौमी. ही जमीन शैक्षणिक प्रयोजनार्थ महसुल मुक्त किंमतीवर दिलेली जमीन शर्तभंग झाल्याने या कार्यालयाचे आदेश क्र.यूडी/महसुल/शर्तभंग/ जमीनबाब /एसआर-९९, दिनांक १८.२.२००० अन्वये शासन जमा करणेत आली होती. सदरचे आदेशाने व्यथित झाल्याने एज्यूकेशन सोसायटी अंबरनाथ यांनी मा. उपजिल्हाधिकारी (अपिले) ठाणे यांचे कोर्टात आरटीएस अपील २२/०४ दाखल केले होते. सदरील अपिलाचा निर्णय दिनांक २०.१०.२००४ रोजी देणेत आला असून या कार्यालयाचे दिनांक १८.२.२००० चे आदेश रद्द करुन निकालात शासनाने नविन अविभाज्य शर्तीवर प्रदान केलेली जमीन ही शासनाचे पूर्व परवानगीशिवाय इतर प्रयोजनासाठी वापरता येत नाही म्हणूनच वाटल्यास महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ५० खाली कारवाई करता येईल असे नमूद केले आहे. त्यानुसार इकडील कार्यालयाकडून सर्व संबंधीतांना नोटीसा बजावणेत आल्या होत्या. कल्पना हॉटेलचे मालक यांनी दिनांक २४.१२.२००४, ४.१०.२००५ व दिनांक १४.११.२००५ अन्वये खालीलप्रमाणे लेखी खुलासा केला आहे.

मौजे-कोहोज खुंटवली येथील डी.डी. स्कीम १५, प्लॉट नं.२३, क्षेत्र १२९२८ चौमी. क्षेत्रापैकी आमचे कब्जात १०३२.७५ चौ.फुट म्हणजेच ११४.७५ चौ.मी. क्षेत्र सन १९६८ पासून आहे. आमच्या कब्जात असलेल्या क्षेत्राचे भाडे आम्ही एज्यूकेशन सोसायटीला देतो. पावत्या दाखल केल्या आहेत. तसेच नगरपरिषदेस कर भरतो. सन १९७० पासून इटिंग हाऊस लायसेन्स आहे. त्याची फोटोप्रत दाखल केली आहे. विक्री कर अधिनियम १९५९ कलम २२ अन्वये दिनांक ३०.१२.६८ चे नोंदणी प्रमाणपत्र दाखल केले आहे. मुंबई, दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अंतर्गत दिनांक ३१.३.१९६६ रोजी दिलेले नोंदणी प्रमाणपत्र दाखल केले आहे. असे कल्पना हॉटेलचे मालक यांचे म्हणणे आहे.

दि एज्युकेशन सोसायटीचे सहकार्यवाह यांनी आपला लेखी खुलासा सादर केला की, मौजे-कोहोजखुंटवली येथील डी.डी. स्कीम १५, प्लॉट नं.२३, क्षेत्र १२९२८ चौ.मी. ही जमीन संस्थेस शैक्षणिक प्रयोजनार्थ महसुल मुक्त किंमतीवर शासनाने प्रदान केली आहे. सदर जागेचा वापर ते शैक्षणिक कार्यासाठी व शालेय उपक्रमांतर्गत होत आहे. शालेय विद्यार्थ्यांची उपहाराची सोय व्हावी म्हणून सन १९६० साली छोटेसे उपहारगृह (कॅन्टीन) सुरु करण्यात आले. श्री. के.एल. शेट्टी या संस्थेच्या आजीव सभासदानेच हे उपहारगृह सुरु केले. पुढे अनधिकृतरित्या

अध्यक्ष
दि एज्युकेशन सोसायटी
अंबरनाथ

त्या कॅन्टीनचे रुपांतर रेस्टॉरंट मध्ये करुन सुमारे १०३२.७५ चौ.फुट जागा व्यापली. त्याचे भाडे अथवा डिपॉझिट, पागडी संस्थेने घेतलेले नाही. जागा खरेदी केली आहे असे श्री. शेट्टी यांचे वारसदार भासवत आहेत. शर्तभंग झाला असल्यास त्याबाबत शास्ती (दंड) आकारुन सदर प्रकरण क्षमापित करावे असा त्यांनी लेखी खुलासा केला आहे.

मौजे-कोहोज खुंटवली येथील डी.डी. स्कीम १५, प्लॉट नं.२३, क्षेत्र १२९२८ चौ.मी. ही जमीन संस्थेस शासनाने शैक्षणिक प्रयोजनार्थ महसुल मुक्त किंमतीवर प्रदान केली असून त्यापैकी १०३२.७५ चौ.फुट म्हणजेच ११४.७५ चौ.मी. क्षेत्रावर हॉटेलचे बांधकाम झाल्याचे संस्था मान्य करीत असल्याने व शर्तभंग झाल्याचे सिध्द होत असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश :

दि एज्यूकेशन सोसायटी अंबरनाथ यांना शासनाने शैक्षणिक प्रयोजनार्थ महसुल मुक्त किंमतीवर प्रदान केलेल्या मौजे-कोहोज खुंटवली येथील डी.डी.स्कीम १५, प्लॉट नं.२३, क्षेत्र १२९२८ चौ.मी. जागेपैकी जागेवरील हॉटेल कल्पना क्षेत्र ११४.७५ चौ.मी. ही जमीन शर्तभंग झाल्याने जमीन त्यांचे ताब्यातून काढून सरकारजमा करण्यात यावी व त्याप्रमाणे तहसिलदार, अंबरनाथ यांनी ११४.७५ चौ.मी. क्षेत्राचा ताबा दि एज्यूकेशन सोसायटी यांचेकडून काढून घेऊन गावचे अभिलेखात सदरची जमीन वहीवाटदाराचे नांव कमी करुन महसुल खाते यांचे नांवे करुन गांवचे दप्तरी तसा अंमल देणेत यावा.

दिनांक : ३० . ११ .२००५.

(रवि कटकधोंड)
उप विभागीय अधिकारी,
उल्हासनगर विभाग उल्हासनगर

प्रत :
१) दि एज्युकेशन सोसायटी,
अंबरनाथ महात्मा गांधी विद्यालय,
अंबरनाथ.
२) श्रीमती गिरीजा आर. शेट्टी
पार्टनर कल्पना हॉटेल, अंबरनाथ
३) तहसिलदार, अंबरनाथ

अध्यक्ष
दि एज्युकेशन सोसायटी
अंबरनाथ